# खगोलप्रेमींनी लुटला सूर्यग्रहणाचा आनंद

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : निरभ्र आकाश असल्याने खंडग्रास सूर्यग्रहण पाहण्याचा खगोलप्रेमींनी आज येथे आनंद लुटला. ग्रहणाची सुरुवात ४ वाजून ५७ मिनिटांनी झाली. चंद्राची सावली सूर्यावर पडू लागल्यानंतर सूर्य झाकोळला जाऊ लागला. ५ वाजून ४९ मिनिटांनी सूर्यग्रहणाच्या मध्यकालापर्यंत सूर्य ३६ टक्क्यांपर्यंत झाकोळला. त्यानंतर सूर्यग्रहण सुटू लागल्याने चंद्राची सूर्यावरील सावली कमी कमी होत गेली. सूर्यग्रहण ६ वाजून ३० मिनिटांनी संपले. कोल्हापुरातील खगोलप्रेमींसह अभ्यासक व नागरिकांनी दुर्बिणीतून ग्रहण पाहण्याची पर्वणी साधली. वर्षातील दुसरे व शेवटचे हे ग्रहण होते.

दरम्यान, चंबूखडी टेकडीवर खगोल अभ्यासक किरण गवळी यांनी ग्रहण समज व गैरसमज याबाबत मार्गदर्शन केले. वैभव राऊत व गवळी यांनी मायलर फिल्टर लावलेल्या दोन दुर्बिणींतून सुमारे दोनशे नागरिकांना ग्रहण दाखवले.



कोल्हापूर : चंबूखडी येथील टेकडीवर खगोल अभ्यासक किरण गवळी यांच्या वतीने ग्रहण पाहण्याची व्यवस्था करण्यात आली होती, त्याचा हौशींनी लाभ घेतला.

विशेष म्हणजे बाबू माळी यांचा वाढदिवस ५ वाजून ४० मिनिटांनी केक कापून येथे साजरा झाला. भूशास्त्र डॉ. किरण पिंपळे यांनी महिलांचे प्रबोधन केले. अंनिसच्या कार्यकर्त्या सीमा पाटील यांनी ग्रहणात कोणतीही पथ्ये पाळण्याची आवश्यकता नसल्याचे सांगितले. यश आंबेडे, प्रमोद वडगावकर, विजय माने, गजानन महाजन, रेश्मा खाडे, भास्कर सुतार, हरी आवटे यांनी परिश्रम घेतले.

यावेळी विवेकानंद महाविद्यालयातील प्रा. डॉ. मिलिंद कारंजकर म्हणाले, 'सूर्यग्रहण आसाम, नागालँड, मणिपूरमधून पाहता आले नाही. तसेच तमिळनाडू, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, बिहार, ओडिशा, सिक्कीम, छत्तीसगड, झारखंड, पश्चिम बंगाल या भागांमधून अंशतः सूर्यग्रहण दिसले. या भागांतल्या इतर भागांमधून मात्र खंडग्रास सूर्यग्रहण पाहता आले.'